# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**अत्यंत महत्वाचे**
क्रसंगाबाअवि/पीएचडी/564 /२०१७
दिनांक : २१.०१.२०१७

**प्रति**
**प्राचार्य**
**सर्व संलग्नित महाविद्यालये**
**संत गाडगेबाबाबा अमरावती विद्यापीठ**
**अमरावती.**

**विषय – नविन अध्यादेश क्रमांक १/२०१६ नुसार अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत..**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) पीएचडी संदर्भातील २०१६च्या निदेशानुसार पीएचडी संदर्भातील नविन अध्यादेश क्रमांक १/२०१६ अस्तित्वात आला असून सदर अध्यादेश कार्यालयाच्या संकेतस्थळावर(www.sgbau.ac.in) उपलब्ध आहे. नविन अध्यादेशाच्या तरतूदीनुसार पीएचडी संदर्भातील कार्यवाही सुरु करण्याबाबत आपल्या स्तरावर अनुसरावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे. संबंधीत अध्यादेशाचे अध्ययन करुन सदर अध्यादेश आपल्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागात संशोधकांच्या माहितीकरीता लावण्यात यावा आणि खालीलप्रमाणे कार्यवाहीचा अवलंब करुन कार्यालयास सहकार्य करावे.

१) अध्यादेश क्रमांक १/१६ मधील Part-A मधील A-1 नुसार मार्गदर्शक मान्यतेकरीताच्या तरतुदींच्या अनुषंगाने कळविण्यात येते की मार्गदर्शक मान्यतेकरीता सदर अध्यादेशासोबत विहित केलेला अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर अर्ज सात प्रतीत विहित नमुन्यात व विहित शुल्क १०००/- रु कार्यालयखाती जमा करुन ३१ ऑगस्ट २०१७ पूर्वी प्राचार्यामार्फत कार्यालयात सादर करण्याबाबत सर्व संबंधीताना आपल्या स्तरावर सूचीत करण्यात यावे.

२) सदर अध्यादेशाच्या Part-A मधील A-2 तरतुदीनुसार प्रयोगशाळा मान्यतेच्या तरतूदींच्या अनुषंगाने कळविण्यात येते की ज्या विषयांकरीता आपले संशोधन स्थळास मान्यता प्राप्त करावयाची आहे अशा विषयांकरीता स्वतंत्रपणे विहित नमुन्यात (नमुना संकेतस्थळावर उपलब्ध आहे) विहित शुल्क ५०००/- रु सह कार्यालयात सादर करावे. अर्ज सादर करण्यापूर्वी अध्यादेशातील तरतूदींचे अवलोकन करावे तसेच Part-C मधील C-2.2 तरतुदीनुसार ज्या महाविद्यालयाच्या प्रयोगशाळांना यापूर्वी मान्यता प्राप्त झालेली आहे अशा महाविद्यालयांनी पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही तथापि अशा महाविद्यालयांनी प्रयोगशाळा मान्यतेसंदर्भातील संपूर्ण माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यात कार्यालयास कळविणे गरजेचे आहे.

३) सदर अध्यादेशाच्या Part-A मधील A-2.2 नुसार सर्व महाविद्यालयाच्या संशोधनस्थळाची कमाल प्रवेश क्षमता प्रती विषय ३० विद्यार्थी अशी असून आपल्या महाविद्यालयातील सर्व मान्यताप्राप्त मार्गदर्शकांचे घोषणा पत्र विहित नमुन्यात ३१ मार्च २०१७ पूर्वी कार्यालयास सादर करावे लागतील. विहित नमुना कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर प्रमाणपत्रातील सत्यतेबाबत आपल्या स्तरावर खात्री करुन घ्यावी. संशोधनस्थळ मान्यतेनंतर Part-B मधील B-2.2 तरतूदीनुसार आपल्या स्तरावर सर्व कार्यवाही करणे आवश्यक आहे.

४) उपरोक्तप्रमाणे आपल्या महाविद्यालयाकडून अध्यादेशाच्या तरतूदीचे पालन करुन सर्व मार्गदर्शकांसंदर्भात आणि संशोधनस्थळा संदर्भात विषयनिहाय माहिती प्राप्त झाल्यानंतर ३१ मे २०१७ रोजी संकेतस्थळावर कार्यालयातर्फे यासंदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे त्यामुळे सर्व माहिती काटेकोर तपासून विषयनिहाय व विद्याशाखानिहाय स्वतंत्रपणे कार्यालयास सादर करण्यात यावी.

५) पीएचडी पंजीयनाकरीता सदर अध्यादेशात कोर्स वर्क नव्याने अंतर्भूत करण्यात आलेला आहे. सदर कोर्स वर्क चे Syllabus and Teaching and Examination Scheme कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संशोधन केंद्राची मान्यता झाल्यानंतरच आचार्य पदवीकरीता कोर्स वर्क प्रारंभ करावा लागेल. अध्यादेशाच्या तरतूदीनुसार यासंदर्भातील कार्यवाही अपेक्षित आहे.ज्या महाविद्यालयात संशोधनस्थळ मान्यताप्राप्त आहे अशा ठिकाणी कोर्स वर्क प्रारंभ करण्याबाबत अध्यादेशाच्या(Part-B मधील B-2.3) तरतूदीनुसार कार्यवाही सुरु करावी.

६) मार्गदर्शकांच्या अंतर्गत संशोधनार्थींची संख्या निश्चित करण्याबाबत अध्यादेशातील तरतूदींचे (Part-A मधील A-2.2) तंतोतंत पालन करावे, आपण सादर केलेल्या माहितीच्या आधारावरच कार्यालय रिक्त जागा घोषीत करणार आहे याची कृपया नोंद घ्यावी.

७) आपल्या महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या मार्गदर्शकांचा आणि विद्यापीठाच्या परीक्षेत्राबाहेरील मार्गदर्शकांचा समावेश मान्यताप्राप्त मार्गदर्शकांच्या यादीत करता येणार नाही तथापि अशा मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली पंजीकृत झालेल्या विद्यार्थ्यांचा समावेश आपल्या संशोधनस्थळ क्षमतेमध्ये (Intake capacity)करण्यात यावा.

आपल्या माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव कळविण्यात येत आहे.

**आपला**
**परीक्षा नियंत्रक**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ.**